दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ११५
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शनिवार, दि.०७ डिसेंबर २०२४


चांगला स्वभाव हा गणितातल्या शुन्यासारखा असतो. ज्याच्या सोबत असतो त्याची किंमत नेहमीच जास्त असते.

## उपराष्ट्रीय पल्स पोलिओ मोहीम !



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०७, ठाणे :** जिल्हा परिषद क्षेत्रात, शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत रविवार ०८ डिसेंबर, २०२४ रोजी ग्रामीण भागातील अंबरनाथ, कल्याण, भिवंडी, मुरबाड तालुक्यात तसेच बदलापूर व अंबरनाथ नगरपालिका क्षेत्रात उपराष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिम राबविण्यात येणार आहे. सर्व बालकांना विहित वयात प्राथमिक लसीकरण, नियमित एएफपी सर्व्हेक्षण आणि पल्स पोलिओ लसीकरण मोहिमे अंतर्गत ० ते ५ वर्षाखालील सर्व बालके संरक्षित करणे हा या मोहिमेचा उद्देश आहे. राज्यात सन १९९५ पासून दरवर्षी पल्स पोलिओ मोहिम राबविण्यात येते.

ठाणे जिल्हा परिषदच्या सार्वजनिक आरोग्य विभागा अंतर्गत कार्यरत सर्व आरोग्य केंद्रामध्ये ही लस मोफत उपलब्ध करण्यात आली आहे. त्याचा लाभ पालकांनी ० ते ५ वर्षापर्यंतच्या सर्व बालकांना द्यावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांनी केले आहे.

ग्रामीण भागातील ० ते ५ वर्षाखालील १ लाख ८ हजार ७२४ बालकांना तर बदलापूर व अंबरनाथ नगरपालिका क्षेत्रातील ६८ हजार ८३३ बालकांना असे एकूण १ लाख ७७ हजार ५५७ बालकांना पल्स पोलिओ लस देण्याचे नियोजन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे.

ठाणे जिल्हा परिषद क्षेत्रात, एकूण १ हजार ४०३ बूथवर ही लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. त्यासाठी ठाणे जिल्हा परिषद ३ हजार ४४० कर्मचारी कार्यरत असतील. गेल्यावेळी झालेल्या मोहिमेत ठाणे जिल्हा परिषद क्षेत्रात, ० ते ०५ या वयोगटातील ०१ लाख ४० हजार ०९२ बालकांना लस देण्यात आली होती.

## कासा गावात ऐतिहासिक आदिवासी पारंपारिक गावसभा



**अक्षराज : निलेश कासट**

**दि.६ डहाणू (पालघर) :** डहाणू तालुक्यातील कासा भिसेनगर येथे आदिवासी रूढी-परंपरा चालीरीती-संस्कृती, परंपरेनुसार पारंपारिक बोलीभाषा प्रमाणे गावसभा बुधवारी घेण्यात आली.

यात आदिवासीचे समाजाचे स्वशासन,प्रशासन व सामाजिक स्थैर्य,समाजाचा सर्वांगीण विकास होण्याकरिता, नियंत्रण करण्याकरिता सभा आयोजित केली होती.यावेळी सर्व ग्रामस्थ

महिला, पुरुष तरुण तरुणीनी गावदेव मंदिर कासा येथे सर्वनी सहभाग घेतला.यावेळी प्रस्तावना करत असताना अजय तुंबडा यांनी सांगितले की,गेल्या अनेक वर्षापासून कासा गावात आपण पारंपारिक बोलीभाषा बोलल्या पाहिजेत,आपली संस्कृती, चालीरिती,रूढी परंपरांना,निसर्गाचे संरक्षण,निसर्ग देवतांचे पूजन,वाघोबा देवाचे पूजन इतर सर्व ज्या परंपरा चालत आहेत त्यावर सखोल माहिती देण्याचा प्रयत्न केला.

पारंपारिक गावसभा चे महत्व दिनेश भोईर यांनी आपल्या गावातील अडीअडचणी समजतात,गाव पाड्याचा विकास साधता येतो,आपल्या मूलभूत समस्या जाणून घेऊन त्यावर उपाय योजना करता येतात,शिवाय शिक्षण,आरोग्य,सुख सुविधा,रस्ते, पाणी,इतर आवश्यक मुद्यांवर चर्चा करून सोडवता येतात.गेल्या अडीच वर्षांपासून ग्रामपंचायत नव्यानं स्थापन होऊन सुधा लक्ष देत नसल्याने ग्रामस्थांनी पारंपारिक सभेला महत्त्व देवून गाव समक्ष आपले गाऱ्हाणे मांडले आणि सदर सभेचे इतिवृत्त जिल्हाधिकारी कार्यालय येथे पाठवण्यात येईल. उपस्थित ग्रामस्थांमध्ये पंचायत सदस्य ज्योती उमतोल, रुपाली घाटाळ, सोनाली कोथे, मनू घरत, पेसा अध्यक्ष संतोष कोरडा, तारपा वादक - भाग्या घाटाळ, चंद्रकांत घाटाळ, सखाराम मातेरा, गोपाळ गोवारी, संतोष कोरडा, राहुल भोये, लक्ष्मण गोवारी, योगेश चौरे, रोहित शेलार, गणेश धोडी, सुनील धांगड, किरण घटाळ, सुरेश गायकवाड, मधुकर गोवारी, अरविंद वावरे, सूरज वावरे इ.उपस्थित होते.

## मोबाईलवर तीनदा तलाक म्हणत दिला घटस्फोट!

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०६, बुलडाणा :** जनतेचा रक्षक असलेल्या पोलीस हवालदाराने कायद्याचे ज्ञान असतानाही त्याच्या पत्नीला मोबाईलवर तीनदा तलाक असे सांगून कथितरित्या घटस्फोट देऊन टाकला. तसेच पत्नी आणि वृद्ध मातेला जीवे मारण्याची धमकी देत राहते घर सोडून देण्यास फर्मावले.आपल्या कथित प्रेयसीसाठी त्याने हा उपद्याप करून स्वत:वर कारवाईचे संकट ओढून घेतले आहे. दानिश देशमुख असे आरोपी पोलीस कर्मचाऱ्याचे नाव असून तो मलकापूर (जि. बुलढाणा) येथे पोलीस हवालदार या पदावर कार्यरत आहे. या घडामोडीमुळे हवालदिल झालेल्या त्याच्या पीडित पत्नीने प्रकरणी बुलढाणा शहर पोलीस ठाणे गाठून रीतसर तक्रार दिली आहे. यावरून आरोपी हवालदार दानिश देशमुख विरुद्ध मुस्लीम महिला (विवाहाच्या अधिकाराचे संरक्षण) कायदा २०१९ च्या कलम ३ आणि ४, भारतीय न्याय संहिता २०२३ च्या ११५(२), ३५२ आणि ३५१ (२) या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडिता पत्नी हिना दानिश देशमुख यांनी दिलेल्या तक्रारीवरून बुलढाणा शहर पोलिसांनी ही कारवाई केली. तक्रारीनुसार पती दानिश देशमुख मलकापूर येथे पोलीस विभागात कार्यरत आहे.

# राज ठाकरेंबाबत देवेंद्र फडणवीसांचं मोठं विधान

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०६, मुंबई :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांच्या आधी मनसे महायुतीमध्ये सहभागी होण्याबाबत मोठी चर्चा पाहायला मिळाली. त्याबाबत खुद्द मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी अनेकदा सकारात्मक विधानंही केली होती. काही ठिकाणी तर त्यांनी निकालांनंतर आमच्या पाठिंब्यावरच महायुतीचं सरकार स्थापन होईल, असाही दावा केला होता. पण विधानसभा निवडणुकीत मनसेचा एकही उमेदवार जिंकून येऊ शकला नाही. त्यांचे एकमेव आमदार राजू पाटील यांचाही पराभव झाला. त्यामुळे मनसेचं आता काय होणार? अशी चर्चा सर्वत्र सुरू झालेली असतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत सूचक विधान केलं आहे.



**काय लागले विधानसभेचे निकाल?**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून यंदाच्या निवडणुकीत जवळपास १२८ उमेदवार उभे होते. त्यात खुद्द राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे हेदेखील माहीम विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवत होते. पण त्यांनाही विजय मिळवण्यात अपयश आलं. मात्र, काही मतदारसंघांमध्ये मनसेचे उमेदवार तिसऱ्या क्रमांकावर असून त्यांना मोठ्या प्रमाणवार मतं मिळाल्याचंही दिसून आलं. त्यामुळे काही मतदारसंघांत तरी मनसेच्या उमेदवारामुळे निकाल वेगळे लागल्याचा अंदाज आकडेवारीवरून लावला जात आहे.

**राज ठाकरेंनी केलं अभिनंदन!**

दरम्यान, शपथविधी झाल्यानंतर राज ठाकरेंनी त्यांच्या अधिकृत एक्स अकाऊंटवरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं अभिनंदन करणारी पोस्ट शेअर केली आहे. २०१९ ला खरंतर ही संधी त्यांना मिळायला हवी होती, पण तेंव्हा आणि पुढे २०२२ मध्ये जे घडलं त्यामुळे ती संधी हुकली. असो, पण यावेळेस महाराष्ट्रातील जनतेने महायुतीला म्हणण्यापेक्षा देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाला जे प्रचंड अविश्वसनीय बहुमत दिलं आहे, त्याचा या राज्यासाठी, इथल्या मराठी माणसांसाठी आणि मराठी भाषा आणि संस्कृतीसाठी तुम्ही योग्य वापर कराल अशी मी आशा करतो, असं या पोस्टमध्ये राज ठाकरेंनी म्हटलं आहे.

दरम्यान, या सर्व घडामोडी चालू असताना राज ठाकरे महायुतीमध्ये सहभागी होण्याच्या चर्चा पुन्हा सुरू झाल्या आहेत. त्यासंदर्भात देवेंद्र फडणवीस यांनी सह्याद्री वाहिनीला दिलेल्या मुलाखतीमध्ये सूचक भाष्य केलं आहे.

**लोकसभेत आम्हाला राज ठाकरेंचा फायदा झाला – देवेंद्र फडणवीस**

मुळात लोकसभेत त्यांनी आम्हाला खुल्या दिलानं पाठिंबा दिला होता. आम्हाला त्याचा फायदा देखील झाला. विधानसभेत आमच्या हे लक्षात आलं की त्यांच्यासमोर महाराष्ट्रात त्यांचा पक्ष आहे. त्यांच्या लोकांनी निवडणुकाच लढल्या नाहीत तर तो पक्ष चालेल कसा? आमच्याकडे त्यांना देण्यासाठी जागाच नव्हत्या. आम्ही तीन पक्ष होतो. ही वस्तुस्थिती समजून त्यांनी विरोधात लढण्याचा निर्णय घेतला, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## ३ तासांचा प्रवास आता केवळ ४० मिनिटांत.. मुंबईतील महत्त्वाच्या प्रकल्पाला मंजुरी

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.६, मुंबई :** मुंबई महानगरपालिकेचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेला कोस्टल रोड- २ चा दुसरा टप्पा आता लवकरच काम सुरू करण्यात येणार आहे.

या कोस्टल रोडमुळे मुंबईकरांची वाहतुक कोंडीतून सुटका झाली आहे. वेगवान प्रवासामुळे प्रवाशांचा वेळ वाचतोय. आता मरिन लाइन्स ते वांद्रे दरम्यानच्या कोस्टल रोडचे काम अंतिम टप्पात आहे. आता मुंबई महापालिका दुसऱ्या टप्प्यातील वर्सोवा-भाईंदर कोस्टल रोड प्रकल्पाच्या कामाला गती देणार आहे. दुसऱ्या टप्प्यातील कोस्टल रोडला सीआरझेडची मंजुरी मिळाली आहे.

वर्सोवा ते दहिसर या १८.४७ किमीच्या कोस्टल रोड साठी पालिकेने कंत्राटदार निश्चित केल्यानंतर आता या प्रकल्पाला सागरी व्यवस्थापन क्षेत्र व राज्याची परवानगी मिळाली आहे. वन विभागासारख्या काही महत्त्वाच्या परवानग्या अद्याप बाकी असल्या तरी सीआरझेड परवानगीमुळे या प्रकल्पाचे काम वेगाने पूर्ण होण्याची शक्यता आहे. या प्रकल्पाचे काम चार वर्षांत पूर्ण होण्याची शक्यता आहे. तसे प्रशासनाचे उद्दिष्ट असल्याचे सांगण्यात येतंय.२०१७ पर्यंत हा प्रकल्प पूर्ण होऊ शकतो.

दक्षिण मुंबईतून थेट भाईंदर पर्यंत जाण्यासाठी सहा टप्प्यात वर्सोवा-दहिसर आणि भाईंदर दरम्यानच्या कोस्टल रोडची बांधणी करण्यात येणार आहे. त्यानुसार, मरिन लाइन्स ते वरळी दरम्यान कोस्टल रोड प्रकल्पाचे काम ऑक्टोबर २०१८ मध्ये महापालिकेने हाती घेतले होते. सध्या हे काम अंतिम टप्प्यात आहेत.



वर्सोवा-दहिसर प्रकल्प गोरेगाव-मुलुंड लिंक रोडला जोडण्यात येणार आहे.

या प्रकल्पाच्या वर्सोवा ते बांगूर-नगर, बांगूरनगर ते माइंड स्पेस मालाड आणि जीएमएलआर, चारकोप ते गोराई आणि दुसरा टप्पा गोराई ते दहिसर आणि तिसऱ्या टप्प्यासाठी दहिसर ते भाईंदर असा असणार आहे.

दरम्यान नरीमन पॉइंट ते विरार हा प्रवास रस्ते मार्गे करायचा झाल्यास साडेतीन तासांचा अवधी लागतो. पण आता अवघ्या पाऊण तासात प्रवास पूर्ण करणे शक्य होणार आहे. कोस्टल रोडमुळे हे अंतर ६५ किमीवर येईल. या प्रकल्पामुळे दक्षिण मुंबई ते विरार हे अंतर अवघ्या ४० मिनिटांत पार करता येणार आहे. कोस्टल रोडमुळे दक्षिण मुंबई ते विरार हे अंतर जोडलं जाणार आहे.

## मंत्रिमंडळात विखेंसोबत आणखी कोण ? उत्सुकता शिगेला !

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.६, अहिल्यानगर :** विधानसभा निवडणुकीत घवघवीत यश मिळवून गुरूवारी सत्तारूढ होणार्या महायुती सरकारमध्ये नगर जिल्ह्यामधून कोणाची वर्णी लागणार, याची उत्सुकता शिगेला पोहचली आहे. मावळत्या सरकारमध्ये महसूलमंत्री असलेले सहकारातील मातब्बर नेते राधाकृष्ण विखे पाटील यांचा मंत्रिमंडळातील समावेश निश्चित मानला जात आहे.

यावेळी महायुतीला मतदानातून भरघोस साथ देणार्या नगर जिल्ह्यातून आणखी कोणाला मंत्रिपदाची संधी मिळणार, याची उत्सुकता शिगेला पोहचली आहे. मात्र रात्री उशिरापर्यंत शपथविधीसाठी अधिकृत निरोप न आल्याने संभ्रम वाढला होता. राज्यात गेल्या ५ वर्षात झालेल्या राजकीय पडझडीनंतर जिल्ह्याचे राजकारणही पूर्णत: नव्या दिशेने सुरू झाले आहे. विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर जिल्ह्यावर भाजप, राष्ट्रवादी आणि शिवसेनेच्या महायुतीने राजकीय वर्चस्व मिळवले आहे. १२ पैकी तब्बल १० आमदार महायुतीचे आहेत. भाजपचे ४, राष्ट्रवादीचे ४ आणि शिवसेनेचे २ आमदार आहेत. या घवघवीत यशानंतर आता मंत्रिमंडळात जिल्ह्याला किती वाटा मिळणार याकडे लक्ष आहे.

काँग्रेस आघाडीच्या काळात जिल्ह्याला सातत्याने मंत्रिमंडळात मोठी संधी मिळत होती. मात्र हे सूत्र २०१४ नंतर बदलले. २०१४ मध्ये युती सरकारमध्ये जिल्ह्यातून राम शिंदे यांना संधी मिळाली होती. या सरकारमध्ये अखेरच्या काही महिन्यांमध्ये राधाकृष्ण विखे पाटील यांच्या रूपाने जिल्ह्याला दुसरी संधी मिळाली होती. २०१९ च्या महाविकास



आघाडीच्या प्रयोगानंतर पुन्हा एकदा जिल्ह्यातून बाळासाहेब थोरात, शंकरराव गडाख व प्राजक्त तनपुरे मंत्री झाले होते. त्यानंतर राज्यात पक्षफुटीमुळे सत्तांतर घडून आले. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात युती सरकारमध्ये राधाकृष्ण विखे पाटील यांना महसूलमंत्री म्हणून महत्त्वाची जबाबदारी मिळाली. आता पुन्हा एकदा जिल्ह्याला मंत्रिमंडळात संधीची प्रतिक्षा आहे.

भाजपाकडून जेष्ठ नेते राधाकृष्ण विखे पाटील यांचा समावेश निश्चित मानला जातो. मात्र भाजपमधून सलग तिसऱ्यांदा आमदार झालेल्या मोनिकाताई राजळे, जेष्ठ आमदार शिवाजीराव कर्डिले आणि विधानपरिषद सदस्य राम शिंदे यांच्यापैकी कोणाला संधी मिळणार,याची भाजप कार्यकर्त्यांना उत्सुकता आहे. जिल्ह्यातून ४ आमदारांसह अजित पवारांची ताकद वाढविण्याऱ्या राष्ट्रवादीतून तरुण चेहरे संधीच्या प्रतिक्षेत आहेत.

त्यात कोपरगावचे आमदार आशुतोष काळे आणि नगर शहराचे आमदार संग्राम जगताप यांना संधी मिळेल, अशी चर्चा आहे. तर शिवसेनेकडून आ. विठ्ठलराव लंघे यांना संधी मिळावी, अशी मागणी त्यांच्या समर्थकांनी पक्षनेतृत्वाकडे केलेली आहे.

## वाघाच्या हल्ल्यात गर्भवती महिला ठार

**दि.६, गडचिरोली :** जिल्हा मुख्यालयापासून १५ किलोमीटर अंतरावरील चातगाव वनपरिक्षेत्रांतर्गत कुरखेडा गावाजवळच्या शेतात काम करीत असलेल्या एका महिलेला आज दुपारी पावणेचार वाजताच्या सुमारास वाघाने ठार केले. शारदा महेश मानकर (२६) रा. कुरखेडा, ता. गडचिरोली असे मृत महिलेचे नाव आहे. शारदाला एक ३ वर्षांचा मुलगा असून, ती ८ महिन्यांची गर्भवती होती, अशी माहिती आहे.

मानकर यांचे शेत कुरखेडा गावापासून दीड किलोमीटर अंतरावर असून, ते खंड क्रमांक ४११ मधील जंगलाला लागून आहे. मानकर यांच्या शेतातील धानाचे चुरणे नुकतेच आटोपले. त्यामुळे खळ्यावर राहिलेले धान गोळा करण्यासाठी शारदा मानकर ही शेतावर गेली होती. धान पाखळत असताना दबा धरुन बसलेल्या वाघाने तिच्यावर हल्ला केला. यात ती जागीच गतप्राण झाली. तिच्या ओरडण्याचा आवाज येताच शेजारच्या शेतातील महिला धावून आल्या. मात्र, तोपर्यंत वाघाने पोबारा केला.

# संपादकीय



## माझे भीमबाबा

डॉ.बाबासाहेब उर्फ भीमराव रामजी आंबेडकर म्हणजे अष्टपैलू व्यक्तीमत्व होते. त्यांना प्रत्येक क्षेत्राचे परिपूर्ण ज्ञान व माहिती होती. सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक धार्मिक, पत्रकारिता, कायदे अशा विविध क्षेत्रात आपल्या अमोघ वक्तृत्वाने व कुशल नेतृत्वाने त्यांनी दीन, दलितांच्या, श्रमिकांच्या विस्थापितांच्या, शोषितांच्या अंधकारमय जीवनाला प्रज्ञेचा संदेश दिला. गलितगात्र झालेल्या मनामनांतून बहुजन समाजक्रांतीचे स्फुलींग चेतविले. त्यांनी मर्दाड झालेल्या समाजाला आपल्या हक्काप्रती जागृत केले. बाबासाहेब म्हणजे प्रेरक, उद्धारक व तारक शक्ती होय. ते नुसते पुस्तकी पंडित नव्हते तर त्यांनी आपल्या आयुष्यात आचार आणि विचार यांची सांगड घातली आणि आपल्या तत्वज्ञानाला कृतीची जोड दिली. त्यांनी मानव मात्रांच्या जीवनातील दुःख, दारिद्रय आणि क्लेश दूर करण्यासाठी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपले पूरे ज्ञान माहिती व बळ लावले. रंजल्या गांजल्या जनतेच्या तसेच स्त्रीवर्गाच्या, शेतकरी-मजूर वर्गाच्या आणि पददलितांच्या उद्धारार्थ आपले प्राण पणाला लावून समतेची मंगलवाट दाखवली. मानवतेची दिव्य ज्योत निर्माण करते ती व्यक्ती केवळ वंदनीयच नव्हे तर ती व्यक्ती प्रेरक, उद्धारक व तारक शक्ती ठरते.

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार तथा भारताच्या राष्ट्रीय ग्रंथ- संविधानाचे ग्रंथकार विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर होत. त्यांचा जन्म वडील रामजी व माता भीमाबाई यांच्या पोटी दि.१४ एप्रिल १८९१ रोजी झाला. बाल भीमावर चांगले संस्कार व्हावेत म्हणून ते दांपत्य दक्ष असत. स्वतःसह भीमरावांना वाचनाची खुप आवड असल्यामुळे घरात ग्रंथसंग्रह हा होताच. वडील रामजी हे मुलांनाही चांगली पुस्तके वाचावयास आणून देत असत. म्हणून बाबासाहेबांच्या आयुष्याच्या अंतिम क्षणापावेतो वाचनाची व अभ्यासपूर्ण चिंतनाची सवय त्यांच्या ठायी आढळते. जगद्गुरू संत तुकारामजी व संतशिरोमणी कबीर हे बाबासाहेबांच्या भावी आयुष्यात अभ्यासाचे विषय झालेले दिसतात.

**शैक्षणिक विचार :** शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी शस्त्र आहे. शिक्षणाने माणसाला आपले कर्तव्य व हक्कांची जाणीव होते. समाजातील अस्पृश्य समाजाला स्वत्वाची जाणीव व्हावी, यासाठी त्यांनी शिक्षणाचे महत्व समाजात विशद केले. ''शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. ते जो माणूस प्राशन करेल तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही,'' असे ते समाज बांधवांना सांगत. प्राथमिक शिक्षण हे सर्व शिक्षणाचा पाया आहे, म्हणून हे शिक्षण अतिशय दर्जेदार व गुणवत्तेचे असावे असे सांगत. ''प्राथमिक शिक्षणाचे ध्येय असे असले पाहिजे की, मुलगा किंवा मुलगी एकदा शाळेत दाखल झाले की, ते पूर्णपणे सुशिक्षित, माहितीपूर्ण व गुणवत्ता प्राप्त करूनच बाहेर पडावेत. शासनाने यासाठी लक्ष द्यायला हवे. त्यांचे म्हणणे हाते की, समाजाच्या सर्व थरापर्यंत शिक्षण गेले पाहिजे. शिक्षण प्राप्त झाल्याने व्यक्ती बौद्धिकदृष्ट्या सशक्त होतो. व्यक्तीला चांगले आणि वाईट यातील फरक समजायला लागतो. प्रज्ञा, शील आणि करुणा हे गुण प्रत्येकाच्या अंगी आणण्यासाठी शिक्षणाची गरज त्यांनी प्रतिपादन केलेली आहे. शाळेत मुलांना केवळ बाराखडी शिकवू नये तर मुलांची मने सुसंस्कृत व गुणवत्तामय बनवावी. समाज हितार्थ या ज्ञानप्राप्त मुलांनी आपली सामाजिक बांधिलकीची कर्तव्ये योग्य व समर्थपणे पार पाडावीत असे शिक्षण असावे. शाळा म्हणजे उत्तम नागरिक व कर्तव्यदक्ष नागरिक बनविणारे कारखाने आहेत. याचे भान या प्रक्रियेत भाग घेणार्यांनी ध्यानी घ्यावे. पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापन इ.स.१९४६ साली करून त्यांनी मुंबइला सिद्धार्थ कॉलेज व औरंगाबादला मिलींद महाविद्यालय सुरू केले. राष्ट्रहीत व समाजहीताचे भान ठेवणारेच खरे शिक्षण होय, असे ते मानत.

**प्रखर राष्ट्रप्रेम व राष्ट्रनिष्ठा :** डॉ. बाबासाहेबांच्या आचार विचारांत राष्ट्रप्रेम व राष्ट्रनिष्ठा भरलेली होती. डॉ.आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा करताच तात्कालीन राष्ट्रीय नेते मंडळी घाबरली. त्यांना वाटले, डॉ.आंबेडकर आता देश सोडून जाणार की काय? परंतु या महामानवांनी निक्षून सांगितले, ''आम्ही या भारत देशाची संतान आहोत. आम्हाला राष्ट्रीयत्वाची जाणीव आहेच. राष्ट्रावर संकट आल्यास प्राण पणाला लावून देशाचे रक्षण केले व पुढेही करूच!'' यात डॉ.आंबेडकरांची प्रखर राष्ट्रनिष्ठा सामावलेली दिसून येते.

# महिला आमदारांची संख्या नगण्य !




भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी निम्मी लोकसंख्या महिलांची आहे. चूल आणि मूल ही महिलांची जुनी ओळख आता पुसली गेली आहे. महिला आज कोणत्याच क्षेत्रात मागे नाहीत. सर्वच क्षेत्रात महिला पुरुषांच्या बरोबरीने काम करत आहे म्हणूनच सर्व क्षेत्रात महिलांना पुरेसे प्रतिनिधित्व मिळाले आहे मात्र एक क्षेत्र असे आहे ज्यात आजही महिलांना पुरेसे प्रतिनिधित्व मिळाले नाही ते क्षेत्र म्हणजे राजकारण.

राजकारणात आजही महिला लोकप्रतिनिधींची संख्या पुरुषांच्या तुलनेत अतिशय नगण्य आहे आता हेच पहा ना नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत जिंकून आलेल्या महिला आमदारांची संख्या अतिशय नगण्य आहे. २८८ जागांसाठी एकूण २५० महिलांनी निवडणूक लढवली पण निवडून आल्या फक्त २१ महिला. याचाच अर्थ एकूण आमदारांपैकी महिला आमदारांची संख्या फक्त ७.२९ टक्के इतकी आहे. विशेष म्हणजे गेल्या विधानसभेत निवडून आलेल्या आमदारांची संख्या यापेक्षाही अधिक होती. मागील विधासभेत २४ महिला आमदार निवडून आल्या होत्या यावेळी ती संख्या ३ ने घटली आहे. यावेळी निवडून आलेल्या महिला आमदारांमध्ये भारतीय जनता पक्षाच्या सर्वाधिक १४ महिलांचा समावेश आहे. शिवसेना ( शिंदे ) गटाच्या २, राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाच्या ४ आणि कॉंग्रेसची १ महिला आमदार म्हणून जिंकून आली आहे. इतर पक्षामध्ये निवडून आलेल्या महिला आमदारांची संख्या शून्य आहे. वास्तविक ज्या देशात पंतप्रधान आणि राष्ट्रपती अशी महत्वाची पदे ज्या महिलांनी भोगली त्या देशात महिला लोकप्रतिनिधींची नगण्य संख्या भारतासारख्या पुरोगामी देशाला भूषणावह नाही. भारताच्या महामहीम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मु या महिला आहेत. डॉ प्रतिभा ताई पाटील या देखील भारताच्या राष्ट्रपती राहिल्या आहेत. इंदिरा गांधी या महिला पंतप्रधानाने सर्वाधिक काळ देशाचे पंतप्रधानपद भूषवले. नुसतेच भूषवले नाही तर यशस्वीरीत्या सांभाळले आणि महिलांकडे देशाचे नेतृत्व दिले तर महिला काय करू शकतात हे दाखवून दिले. महिलांना जर राजकारणात पुरेसे प्रतिनिधित्व दिले तर महिला त्यांना दिलेली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडू शकतात हे वेळोवेळी सिद्ध झाले आहे. देशात अशा अनेक महिला आहेत की ज्यांनी आपल्या नेतृत्वाने देशपातळीवर स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यात इंदिरा गांधी तर आहेतच पण त्यांच्यासोबत दिवंगत जयललिता, सुषमा स्वराज, शिला दीक्षित, ममता बॅनर्जी, उमा भारती, मायावती, वसुंधरा राजे यांनी आपापल्या राज्याचे मुख्यमंत्रीपद यशस्वीपणे सांभाळले. अनेक महिलांनी राज्यांचे राज्यपालपद भूषवले. महाराष्ट्रातून सुप्रिया सुळे, रक्षा खडसे या खासदारांनी राष्ट्रीय राजकारणात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे याचाच अर्थ जर राजकारणात महिलांना पुरेशी संधी मिळाली तर त्या त्यात यशस्वी होतात. दुर्दैवाने महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात आजही महिला आमदारांची संख्या अतिशय नगण्य आहे. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात अजून एकदाही महिला मुख्यमंत्री बनू शकली नाही यासारखी दुसरी शोकांतिका नाही. मुख्यमंत्रीच कशाला ? अगदी मंत्री बनणाऱ्या महिलांची संख्या देखील हाताच्या बोटावर मोजता येईल इतकीच आहे. मागील मंत्रिमंडळात तर अदिती तटकरे या एकमेव महिला मंत्री होत्या. यावेळी तरी ही संख्या वाढून मंत्रिमंडळात महिलांना पुरेसा स्थान मिळून त्यांचा योग्य मान राखला जाईल अशी अपेक्षा आहे. राजकारणात महिलांना ५० टक्के आरक्षण मिळावे अशी मागणी केली जाते त्या मागणीला सर्वच राजकीय पक्ष पाठिंबा देतात मात्र त्यासाठी पुढाकार घेण्याचे टाळतात. राजकारणात ५० टक्के आरक्षण मिळाले तर महिला राजकारणात आपल्या कर्तृत्वाचा झेंडा रोवतील यात शंका नाही. नाही म्हणायला स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांना ३३ टक्के आरक्षण आहे त्याचा फायदा महिलांना मिळाला आहे. ग्रामपंचायतिच्या सरपंचापासून जिल्हा परिषद अध्यक्ष, महापौर अशी महत्वाची पदे महिलांनी यशस्वीपणे भूषवली आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थेप्रमाणे लोकसभा आणि विधानसभेतही महिलांना आरक्षण मिळाले तर महिला तिथेही आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवतील यात शंका नाही.

**- श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## महाबळेश्वर तालुक्यातील क्रिकेटपटूची महाराष्ट्र संघात निवड



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.०६, महाबळेश्वर :** मथुरा उत्तर प्रदेश येथे होणाऱ्या राष्ट्रीय टेनिस क्रिकेट स्पर्धेमध्ये महाबळेश्वर तालुक्यातील क्रिकेटपटू प्रज्वल प्रसाद कात्रट, सुदेश लक्ष्मण घाडगे, फैजान आसिफ शारवान यांची १९ वर्षाखालील संघात निवड झाली आहे. नाशिक येथे झालेल्या राज्यस्तरीय टेनिस क्रिकेट निवड चाचणी स्पर्धेमध्ये सातारा जिल्ह्याच्या संघातून या तिन्ही खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत महाराष्ट्र संघात आपले स्थान निश्चित केले आहे. तालुक्यातील क्रिकेट प्रेमींनी निवड झालेल्या खेळाडूंना शुभेच्छा दिल्या आहेत. महाराष्ट्र स्पोर्ट्स अकादमीचे कार्याध्यक्ष राहील वारुणकर, सचिव व क्रीडा शिक्षक मुनसिफ वारुणकर यांच्या मार्गदर्शन व विशेष प्रयत्नाने तालुक्यातील खेळाडूंना राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये पाठवण्यात यश आले आहे.

## शिळगावमध्ये श्री कुलदैवत खंडोबा चंपाषष्टी पालखी सोहळ्याचे आयोजन

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०६, शिळफाटा (ठाणे) :** दि.७ डिसेंबर २०२४ रोजी शिळगावामध्ये श्री कुलदैवत एक खंडोबा मंदिर येथे चंपाषष्ठी पालखी सोहळाचे आयोजन समस्त पाटील परिवार व ग्रामस्थ मंडळ शिळगांव तर्फे करण्यात आले आहे.दि. ०२ डिसेंबर २०२४ रोजी पासून मंदिरात ग्रंथ वाचण्यास सुरुवात झाली आहे. ०७ डिसेंबर २०२४ रोजी पहाटे अभिषेक, ८ ते ९ पूजन, ९ ते १२ हवन, ४ ते ७ वाजेपर्यंत पालखीची मिरवणूक संपूर्ण गावामध्ये ढोल ताशाच्या गजरात भंडारा उधळत फटांग्याची अतिशय बाजी करीत निघणार आहे.

सायंकाळी ७ ते ७:३० वाजेपर्यंत आरती होणार आहे. त्यानंतर महाप्रसादाचा लाभ हा रात्री १०:०० वाजेपर्यंत आलेल्या सर्व भाविक भक्तांसाठी असणार आहे. याची सर्व भाविक भक्तांनी नोंद




घ्यावी. श्री कुलदैवत खंडोबा चंपाषष्ठी पालखी सोहळा साठी संपूर्ण पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे अशी विनंती समस्त पाटील परिवार कडून करण्यात आली आहे. सर्व भाविक भक्तांना या पालखी सोहळ्या निमित्ताने खंडोबाच्या पालखीला खांदा लावण्याची संधी लाभणार आहे. येळकोट येळकोट जय मल्हार सदानंदाचा येळकोट असा जय घोष ७ डिसेंबर रोजी शिळगांवात पाहायला मिळणार आहे. चला तर या पालखीचे तुम्ही साक्षीदार व्हा! या पालखी सोहळ्याला यावर्षी ८ वर्षे पूर्ण होत आहे.

शिळगांवात सोमवारपासून चंपाषष्ठी षडयंत्र उत्सवात प्रारंभ झाला. उत्सव मूर्तींची विविध पूजा करून अभिषेक करून उत्साहात व धार्मिक वातावरणात मंदिरात घटस्थापना करण्यात आली. सोमवारपासून सहा दिवस शिळगांवात षडरात्रोत्सव साजरा होत आहे. पौराणिक काळात ऋषीमुनींना त्रास देणाऱ्या मणी व मल्ल दैत्यांचा संहार करण्यासाठी महादेवाने मल्हारी मार्तंडाचा अवतार धारण करून चंपाषष्ठी च्या दिवशी दैत्यांचा वध करून विजय मिळवला. हे युद्ध मार्गशीर्ष शुद्ध प्रतीपदा ते षष्ठीपर्यंत ६ दिवस चालले होते तेव्हापासून या सहा दिवसांत खंडोबा गडावर विजयोत्सव साजरा केला जातो. चंपाषष्ठी हा दिवस विजय दिन म्हणून ही साजरा केला जातो.

### सत्ता गृहण..

सु संपन्न सत्ता गृहण
मिळे राज्य आभूषण
शकट चालवी सफल
सकला वाटावे भूषण

सर्व धर्मिया द्या मुभा
सुखे साजरे करे सण
सर्व धर्म समभावाचे
भाकड नसावे भाषण

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

अहंकार रे वेशीबाहेर
आंदोलकां संभाषण
संवाद साधा भुकेशी
हलक्यात ना उपोषण

भ्रष्टाचाराच्या नाकांत
वेळीचं बांधावे वेसण
गोंडस छान योजनेचे
पोखरुन करी शोषण

सोबतघ्यावे विरोधका
कशाला भांडण घर्षण
विरोधी हवे जिम्मेदार
विवादमिटवावे तक्षण

समजूनघ्यावी समस्या
उत्तराचे करे विश्लेषण
उकल करून गुंत्याची
प्रश्ना उन्मेष सूक्ष्मेक्षण

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# होम गार्ड ऑफ इंडिया : एक स्वयंसेवक दल

या दिवशी होमगार्ड सदस्यांच्या समर्पणाचे कौतुक केले जाते. त्यांच्या योगदानाला मान्यता देण्यासाठी विविध कार्यक्रम आणि परेड आयोजित केल्या जातात. भारतीय होमगार्ड स्थापना दिन आपल्याला देशाच्या सुरक्षेसाठी त्यांच्या कार्याची जाणीव करून देतो आणि त्यांच्या कर्तव्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी प्रदान करतो. हा दिवस त्यांच्या धैर्य आणि निष्ठेचा सन्मान करण्याचा आहे. इतिहासाच्या पानात ६ डिसेंबर म्हणूनच होमगार्ड स्थापना दिन महत्त्वाचा आहे. देशाच्या आणि जगाच्या इतिहासात ही तारीख अनेक महत्त्वाच्या कारणांमुळे नोंदली जाते. भारतातील होमगार्डचे नाव सर्वांनाच परिचित आहे, परंतु ही संस्था कधी आणि का स्थापन झाली हे अनेकांना माहीत नाही? वास्तविक, सन १९४६मध्ये बॉम्बे प्रांतात होमगार्ड युनिटची स्थापना झाली. लष्कर, नौदल, हवाई दल आणि इतर सुरक्षा यंत्रणांना कोणत्याही अप्रिय परिस्थितीत नागरिकांना सुरक्षा प्रदान करण्यासाठी मदत करणे हा त्याचा उद्देश होता. परंतु सन १९६२च्या चीन युद्धादरम्यान पोलिसांना पुन्हा एकदा मदतनीसांची गरज भासू लागली आणि दि.६ डिसेंबर १९६२ रोजी होमगार्ड संघटनेची पुनर्रचना करण्यात आली. तेव्हापासून होमगार्ड विभाग दरवर्षी या तारखेला स्थापना दिवस साजरा करतो.

होम गार्ड ऑफ इंडिया हे एक स्वयंसेवक दल आहे ज्याला भारतीय पोलीस सेवेचे- आईपीएस सहाय्यक म्हणून काम दिले जाते. होमगार्ड्स संघटनेची पुनर्रचना सन १९६६मध्ये चीन-भारतीय युद्धानंतर पीपल्स रिपब्लिक ऑफ चायना सह भारतात झाली, जरी ती काही ठिकाणी वैयक्तिकरित्या लहान तुकड्यांमध्ये अस्तित्वात होती.

व्यावसायिक, महाविद्यालयीन विद्यार्थी, कृषी आणि औद्योगिक कामगार परंतु केवळ सरकारला इत्यादी नागरी समाजातील विविध विभागांमधून होमगार्ड्सची भरती केली जाते जे समाजाच्या भल्यासाठी आपला मोकळा वेळ देतात. १८-५० वयोगटातील भारतातील



– संकलन व सुलेखन –
कृष्णकुमार निकोडे गुरूजी
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

सर्व नागरिक पात्र आहेत. होमगार्ड्समधील सदस्यत्वाचा सामान्य कालावधी तीन ते पाच वर्षांचा असतो. होमगार्ड्स द्वारे पार पाडायची कार्ये सूचीबद्ध आहेत- १) पोलिसांसाठी सहाय्यक म्हणून काम करणे आणि सामान्यतः अंतर्गत सुरक्षा राखण्यात मदत करणे. २) कोणत्याही प्रकारच्या आपत्कालीन परिस्थितीत समुदायाला मदत करणे- जसे की हवाई हल्ल्याची खबरदारी किंवा कोणत्याही नैसर्गिक आपत्तीवर.

देशाच्या संरक्षणाशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे जोडलेल्या विशेष कार्यांसाठी आपत्कालीन दल म्हणून कार्य करणे. ३) मोटार वाहतूक, अभियांत्रिकी गट, अग्निशमन दल, नर्सिंग आणि प्रथमोपचार, वीज पुरवठ्याचे संचालन, पाणी आस्थापना आणि दळणवळण यंत्रणा इत्यादी अत्यावश्यक सेवा प्रदान करण्यासाठी कार्यात्मक युनिट्स राखण्यासाठी. ४) १८ बटालियनची बॉर्डर विंग बॉर्डर सिक्युरिटी फोर्स- बीएसएफला आंतरराष्ट्रीय सीमेवर- किनारी भागात घुसखोरी रोखण्यासाठी, व्हीए/ व्हीपीएस आणि दळणवळणाच्या ओळी आणि बाह्य आक्रमणाच्या वेळी असुरक्षित भागात सहाय्य करते. १८ बटालियन खालीलप्रमाणे तैनात आहेत- आसाम-एक बीएन, गुजरात- चार बीएनएस, मेघालय-एक बीएन, पंजाब- सहा बीएनएस, राजस्थान (चार बीएन, त्रिपुरा- एक बीएन, आणि पश्चिम बंगाल- एक बीएन. ५) सागरी तुकड्या भारतीय तटरक्षक दल- आईसीजी सहाय्यक म्हणून काम करतात. फायर विंग भारतीय अग्निशमन सेवेला मदत करते.

सामर्थ्य आणि संघटना: देशात होमगार्डची एकूण संख्या ५७३,७९३ आहे ज्याच्या तुलनेत सध्या २५ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये ४८६, ४०१ होम गाड्र्सची संख्या वाढली आहे. हे केरळमध्ये अस्तित्वात नाही, कारण त्यांची कर्तव्ये इतर संस्थांद्वारे पार पाडली जातात. प्रशिक्षण: नागरी संरक्षण आणि गृहरक्षक दलाच्या जवानांना प्रशिक्षण देण्यासाठी विविध राज्यांमध्ये केंद्रीय नागरी संरक्षण प्रशिक्षण केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. प्रशिक्षणात वैयक्तिक तसेच सांघिक प्रशिक्षण असते. स्वातंत्र्यानंतर नागरी संरक्षण प्रशिक्षणाचे कार्य सन १९६२नंतरच पुनरुज्जीवित झाले. उपकरणे- होमगार्डला ७.६२ मिमी सेल्फ-लोडिंग रायफल्स- ब्रिटिश एलवन-एवनची भारतीय आवृत्ती, स्टेन गन आणि ब्रेन गन यांसारखी जुनी शस्त्रे वापरण्यासाठी सुसज्ज आणि प्रशिक्षित केले जाते, जे भारतीय आयुध निर्माणीद्वारे स्वदेशी बनवले जातात.

**।। भारतीय होमगार्ड दिनाच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी ।।**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## जिल्हास्तरीय युवा महोत्सवात लोकगीत, स्पर्धेत स्वराज ग्रुप प्रथम



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५, बुलढाणा :** क्रीडा व युवक सेवा संचालनालयां अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व नेहरू युवा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने तथा एन एस एस विभागाच्या जिल्हा क्रीडा संकुल येथे जिल्हास्तरीय युवा महोत्सव आयोजित करण्यात आला. यामध्ये बुलडाणा स्वराज्य कला अँकडमी मुलींचा चमूने' लोकगीत गायन स्पर्धेत सर्वोत्कृष्ट गित सादर करुन,जिल्हा स्तरावर प्रथम क्रमांकाने विजयी झाला.

विजयसिंह राठोड यांचा स्वराज ग्रुप बुलढाणा यांनी जिल्हास्तरीय महोत्सवात विभाग स्तरांवर सहभाग नोंदविला. त्यात वादक - प्रणव डोंगरदिवे, हरिओम गावंडे, श्रीराम गावंडे, तसेच लोकगीत गायिका, कु. स्नेहल पवार, वंशिता तायडे, आरती घोडके, कुमुद पवार, दुर्वाताई म्हस्के, योगिता पवार, वादक, श्रीराम गावंडे, आणि शिवचरण वरपे यांनी सहभाग नोंदविला. रोख रक्कम आणि प्रशस्ती सहभाग पत्र आणि मेमेंटो देवून ग्रुपला उपस्थित मान्यवर व परिक्षक यांचे हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी या महोत्सवात वकृत्व, लोकगीत, कथा लेखन, चित्रकला, लोकनृत्य, आदी कला प्रकार व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हा क्रिडा अधिकारी बी.एस. महानकर,जिल्हा नियोजन अधिकारी राहूल पवार, प्रा. डॉ. गोविंद गायकी, नेहरू युवा केंद्राचे अजय सिंह राजपूत आदी उपस्थित होते. सदर गायनासाठी व यशस्वीतेसाठी अजयसिंह राठोड, जय राठोड,विजयसिंह राठोड, शाहीर मनोहर पवार यांनी मार्गदर्शन केले.

## 'लाईट ऑफ लाईफ'च्या विद्यार्थ्यांना छोटीसी आशा संस्थेच्या सहकार्याने वस्तुंचे वाटप




**अक्षराज : मानसी कांबळे**

**दि.०५, कर्जत :** 'लाईट ऑफ लाईफ' ट्रस्टच्या कर्जत विभागातील आनंदो आणि आनंदो प्लस प्रकल्पच्या ४२० विद्यार्थ्यांना 'छोटीसी आशा' या संस्थेच्या पुढाकाराने विद्यार्थ्यांना त्यांनी इच्छा व्यक्त केलेल्या वस्तुंचे वाटप करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने सायकल, क्रिकेट किट, तबला सेट, ढोलकी, गिटार, स्मार्ट वॉच, शिलाई मशीन अशा विविध वस्तुंचा समावेश होता.

वस्तुस्थिती अशी आहे की, दुर्लक्षित मुलांच्या इच्छा पुर्ण झाल्यानंतर ते सर्वोत्कृष्ट कामागिरी करतात आणि ते मोठे स्वप्न पाहण्याचे धाडस करू शकतात याच विचाराने छोटीशी आशा या संस्थेच्या संस्थापिका मिमी मॅडम यांच्या माध्यमातून आणि 'लाईट ऑफ लाईफ'च्या संस्थापिका डाँ. विली मॅडम यांच्या प्रेरणेने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कर्जतमधील 'लाईट ऑफ लाईफ' संस्थेच्या ४२० विद्यार्थ्यांना सायकल, गिटार, तबला सेट, स्मार्ट घड्याळ, शिलाई मशीन आणि क्रिकेट किटसह शुभेच्छा भेटवस्तू मिळाल्या. अनंत प्रकल्पच्या विद्यार्थ्यांनी 'दिल है छोटासा...छोटीसी आशा, हे गाणे गाऊन नृत्य सादर केले. या कार्यक्रमात छोटीसी आशा संस्थेच्या सीमा मॅडम आणि त्यांचे सहकारी सहभागी झाले होते. 'लाईट ऑफ लाईफ' संस्थेच्या सिनियर व्यवस्थापक सेजल मॅडम यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## अनधिकृत फलक हटवण्याची मोहीम दररोज राबवण्याचे आदेश



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०६, ठाणे :** ठाणे महापालिका क्षेत्रात अनधिकृत फलक, पोस्टर्स, बॅनर्स हटवण्याची मोहीम दररोज राबवण्याचे आदेश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी सर्व सहाय्यक आयुक्तांना दिले आहेत. त्याचबरोबर, नोटीसा देणे, दंड वसुली आणि गुन्हा दाखल करणे याचा सहाय्यक आयुक्तांनी दैनंदिन आढावा घ्यावा, असेही आयुक्त राव यांनी स्पष्ट केले आहे. महापालिका क्षेत्राचे विद्रुपीकरण थांबवण्यासाठी दैनंदिन मोहीम राबवून अनधिकृत फलक हटवण्याची आवश्यकता आहे. त्याबाबत, मा. उच्च न्यायालयाचे अतिशय काटेकोर आदेश आहेत. त्याचे पालन सगळ्यांनी करावे. अनधिकृत पोस्टर, बॅनर, फलक लावला की त्यावर नोटीस, दंड आकारणी आणि गुन्हे दाखल करणे ही कारवाई अतिशय प्रभावीपणे करण्यात यावी, असे आयुक्त राव म्हणाले.

ठाणे महापालिकेच्या नागरी संशोधन केंद्र येथे आयुक्त सौरभ राव यांनी बुधवारी सायंकाळी सर्व उपायुक्त, सहाय्यक आयुक्त, विभागप्रमुख, कार्यकारी अभियंता यांची आढावा बैठक घेतली. त्यास, अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा उपस्थित होते. उपायुक्त (मुख्यालय) जी. जी. गोदेपुरे यांनी यावेळी विविध विभागांकडील कामांचा आढावा घेणारे सादरीकरण केले.

### जानेवारी महिन्यात वृक्ष छाटणीचा पहिला टप्पा

दरवर्षी पावसाळ्याच्या आगमनापूर्वी केल्या जाणाऱ्या वृक्ष छाटणीबाबत तक्रारी येतात. त्यामुळे आयुक्त राव यांनी ही वृक्ष छाटणी दोन टप्प्यात करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार, उद्यान विभागाने नियोजन केले आहे. जानेवारी महिन्यापासून झाडांच्या वाढलेल्या आणि धोकादायक स्थितीतील फांद्या, धोकादायक वृक्ष यांची पाहणी करून त्यांच्या छाटणीचे काम हाती घेण्यात येणार आहे. हे काम वेळेत सुरू करण्याची सूचना आयुक्त राव यांनी बैठकीत दिली.

## न्यायालयाची ईमारत पूर्ण करून द्यावी ; अन्यथा आमरण उपोषणाचा इशारा

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.०६, महाबळेश्वर :** महाबळेश्वर येथील भौगोलिक परिस्थितीचा विचार करता येथील पक्षकारांचा न्यायालयीन कामकाजासाठी आर्थिक, मानसिक व शारीरिक त्रास कमी करण्यासाठी व महाबळेश्वर हे तालुक्याचे ठिकाण असल्याने येथेच न्यायालय असावे अशी मागणी तालुक्यातील जनतेमधून जोर धरू लागली असतानाच येथील प्रसिद्ध वकील विजयराव दस्तुरे यांच्या प्रयत्नाने अखेर सन २०१० साली नगरपालिकेच्या मालकीच्या शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या पार्सनेज



मार्केट येथील वरच्या मजल्यावर तत्कालीन उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती डी.वाय.चंद्रचूड यांच्या हस्ते १७ जानेवारी २०१०रोजी उद्घाटन करण्यात आले.

कालांतराने सदर ईमारत धोकादायक असल्याचे पालिकेने कळविले असता सदर ईमारती मधील न्यायालय नगरपालिकेच्या मालकीच्या तहसील कार्यालयाजवळील अग्नीशमन ईमारती मध्ये तात्पुरते स्थलांतरित करण्यात आले व लवकरच पालिकेच्याच महात्मा फुले मार्केट शेजारच्या नियोजीत भाजी मंडईची ईमारत न्यायालयासाठी सर्व सोयीनीयुक्त नुतनीकरण करून भाडेतत्त्वावर देण्याचे पालिकेने ठरवले मात्र आता साधारण चार वर्षांपेक्षा जास्त कालावधी होऊन देखील सदर ईमारतीचे काम पूर्ण होत नसल्याने अखेर महाबळेश्वर वकील संघाचे अध्यक्ष विजयराव दस्तुरे यांनी आमरण उपोषण व आंदोलनाचा इशारा दिला आहे.

## ध्रुव हुमणे याचा पाणबुडी देवी कलामंच मुंबई वतीने होणार सन्मान

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.०६, मुंबई :** कोकणातील नमन,जाखडी,भारुड अशा विविध लोककलांना व लोककलावंतांना हक्काचं व्यासपीठ उपलब्ध निर्माण करत, मुंबई रंगमंचावर कार्यक्रमांचे हाऊसफुल्ल तितकेच दर्जेदार आयोजनात अव्वल स्थान निर्माण करणारी, कला, क्रीडा, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्षेत्रातील अग्रगण्य संस्था श्री पाणबुडी देवी कलामंच मुंबई ह्या संस्थेचा दिनदर्शिका प्रकाशन सोहळा-२०२५,व ह्या मोसमातील नमन कार्यक्रमाचा शुभारंभ प्रयोग मा.दिनानाथ मंगेशकर नाट्यगृह, विलेपार्ले (मुंबई) येथे, मंगळवार दिनांक.१० डिसेंबर२०२४ रोजी, रात्री.०८:३० वा. संपन्न होणार आहे, प्रसंगी श्री हनुमान भक्त सेवा




मंडळ, मु.पो.फणसवळे (रत्नागिरी) यांचा नमन नाट्यप्रयोग,सतीश जोशी लिखित/ दिग्दर्शित हवेली एक रहस्य हे वगनाट्यकृती सादरीकरण होणार आहे. त्याच बरोबर या कार्यक्रमावर FSKA वर्ल्ड कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेत गुहागर तालुक्यातील भातगाव येथील कु.ध्रुव निलेश हुमणे याला सुवर्णपदक प्राप्त झाल्याबद्दल त्याचा गौरव म्हणून आदर्श युवा पुरस्कार २०२४ ने सन्मानित करण्यात येणार आहे.

सदर नमन, दिनदर्शिका प्रकाशन व पुरस्कार वितरण सोहळ्याला प्रमोद गांधी (उद्योजक/संपर्क)- अध्यक्ष -महाराष्ट्र नवनिर्माण सेना गुहागर तालुका, रविंद्र मटकर- (अध्यक्ष) नमन लोककला संस्था:कार्यक्षेत्र भारत, अर्जुन माचिवले (कलाशिक्षक / सुप्रसिद्ध चित्रकार) यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असल्याची अधिकृत माहिती श्री पाणबुडी देवी कलामंच संस्थेचे प्रतिनिधी दिपक कारकर, अध्यक्ष संतोष घाणेकर यांनी दिली.

## वाद-विवाद स्पर्धेत कमलेश चव्हाण चे घवघवीत यश..

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५, अमरावती :** अमरावती विद्यापिठ अंतर्गत 'नानीबाई शिक्षण महाविद्यालय अमरावती' या प्रतिष्ठित महाविद्यालयातील प्रथम वर्षाचे बी.एड् (इंग्लीश लिटरेचर)चे मराठवाडा व विदर्भ विभागातून वक्तृत्वाच्या क्षेत्रातून' 'उत्कृष्ट महाराष्ट्र वक्ता' म्हणून सर्वश्रुत ख्याती पावलेले विद्यार्थी कमलेश चव्हाण यांनी, दि.६ डिसेंबर २०२४ रोजी डा.बाबासाहेबा आंबेडकर महाविद्यालय अमरावती तर्फे घेण्यात आलेल्या आंतर महाविद्यालयीन वाद-विवाद स्पर्धेत सांघिक सर्व द्वितिय पारितोषिक पटकावत आपल्या यशाने आपल्या महाविद्यालयाच्या प्रतिष्ठेत मानाचा तुरा खोवला.



या वादविवाद स्पर्धेत आजच्या ज्वलंत व ऐरणीवरील प्रश्नावर आधारीत विषय होता, EVM मशीनद्वारेच निवडणूकीतील मतदान करणे योग्य.? की अयोग्य? यापैकी' EVM मशीनद्वारेच मतदान करणे योग्य.. आपल्या या विषयाचा बचाव करत जबरदस्त व प्रभावी युक्तिवाद साधून... आपल्या डीबेटींगद्वारा सभेला प्रभावीत करत कमलेश चव्हाण यांनी आंतर महाविद्यालय वाद-विवाद स्पर्धेमध्ये घवघवीत यश मिळवून, २५संघांच्या युक्तिवाद साधणा-या स्पर्धकांशी झुंज देऊन सर्व द्वितिय सांघिक पारितोषिक पटकावत आपल्या महाविद्यालयाच्या प्रतिष्ठेत मानाचा तुरा खोवला. याबद्दल महाविद्यालयाचे विद्यमान प्राचार्य डा. गाडे, व सर्व प्राध्यापकवृंद..कमलेशवर कौतुकपूर्ण शुभेच्छांचा वर्षाव करीत आहेत. याबद्दल शालेय जीवनापासून तर आजपर्यंतचे कमलेशचे हे ४१सावे पारितोषिक आहे.तसेच कमलेश चव्हाण यांचे सहस्पर्धक अविनाश रोकडे यांनीसुध्दा EVM द्वारा मतदान करणे अयोग्य या विरोधी विषयावर प्रभावी युक्तिवाद मांडला. हे लक्षात घेत संपूर्ण मराठवाडा विभागातील शैक्षणिक क्षेत्रातून तसेच अमरावती जिल्ह्यातील मित्रपरिवार व कमलेश चव्हाण व अविनाश रोकडे यांचे कुटूंब या यशाबद्दल कमलेश चव्हाण व श्री. रोकडे यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करीत आहेत.

## खामसवाडी सबस्टेशनला ५ एमव्हीए ट्रांसफार्मर देण्याची ग्रामस्थांसह शेतकऱ्यांची मागणी

**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.५ कळंब :** कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील सबस्टेशनला ५ एम व्ही ए ट्रांसफार्मर तात्काळ देण्याची मागणी जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे अर्जदार प्रभाकर शेळके यांच्या सह ग्रामस्थांनी केली आहे.

दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, खामसवाडी येथील सब स्टेशन मधील ५ एम व्हि ए चा ट्रांसफार्मर जळाला होता त्यामुळे ग्राम स्थांनी नविन ट्रांसफार्मर मिळण्यासाठी दि.१७ जुन २०२२ रोजी खामसवाडी येथील शेतकरी व ग्रामस्थांच्या वतीने जन आंदोलन करुन मागणी केली होती. त्यामुळे दि.१९जुन २०२२ रोजी तात्पुरती सोय व्हावी या उद्देशाने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने एक दुसराच नादुरुस्त ट्रांसफार्मर देण्यात आला आहे. सदरील ट्रान्सफॉर्मर हा कमी दाबाने वीजपुरवठा करत असल्यामुळे शेतकऱ्यांना अडचणी निर्माण होत आहेत. तर महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडे दोन वर्षापूर्वी नवीन ट्रान्सफॉर्मर मंजूर झाला आहे परंतु बदलुन दिलेला नाही. तो तात्काळ द्यावा अशी मागणी होत आहे.

मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शेतकऱ्यांना दिवसा १२तास वीज देणे बंधनकारक असताना आम्हाला ८ तासाच्या शिफ्ट मध्ये रात्री अपरात्री विज पुरवठा होतो आहे. मंजुर झालेला ट्रान्सफॉर्मर महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने बदलुन न दिल्यास दि.२० डिंसेबर २०२४ रोजी अधिक्षक अभियंता कार्यालय धाराशिव येथे लाक्षणिक उपोषणाला बसणार आहोत. या उपरही सदरील विषय मार्गी



नाही लागल्यास मा. न्यायालयातुन न्याय मागवा लागले असे म्हटले आहे.

सदरील निवेदनाच्या प्रती मा.जिल्हा पोलीस अधीक्षक धाराशिव, मा.आमदार कळंब-धाराशिव विधानसभा मतदारसंघ, मा.खासदार धाराशिव, कार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण धाराशिव,उप अभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कळंब यांना देण्यात आले आहेत. सदरील निवेदनावर प्रभाकर ज्ञानेश्वर शेळके, अशोक त्र्यंबकराव शेळके, शरद वसंतराव शेळके, अविनाश अंगद शेळके, दयानंद बळीराम पाटील, शशिकांत पाटील,दिलीप पाटील,राजेश गरड, मनोज शेळके यांच्यासह अनेक शेतकरी व ग्रामस्थांच्या स्वाक्षर्या आहेत.

## कर्णबधिर विद्यार्थ्यांनी सादर केले मल्लखांबचे प्रात्यक्षिक

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०५, ठाणे :** जागतिक दिव्यांग दिनानिमित्त श्री भैरव सेवा समिती, भिवंडी द्वारा संचालित श्री नाकोडा कर्णबधिर विद्यालय, सरवली येथे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी आज, दि. ४ डिसेंबर २०२४ रोजी भेट दिली.

याप्रसंगी कर्णबधिर दिव्यांग विद्यार्थी यांना शिक्षणासोबत व्यावसायिक शिक्षण, प्रशिक्षण व पुर्नवसनाची गरज आहे. श्री भैरव सेवा समिती, भिवंडी चे संस्थापक स्व.राजमलजी जैन यांच्या कार्याची प्रशंसा केली तसेच ठाणे जिल्हयातील एकुण ४ हजार शाळांमध्ये नाकोडा कर्णबधिर शाळा ही इतर सर्व शाळांसाठी आदर्श मॉडेल म्हणून



कार्यरत आहे अशा शब्दात शाळेचे कौतुक केले व पुढील वाटचालीसाठी विद्यार्थ्यांना मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी शुभेच्छा दिल्या. जागतिक दिव्यांग दिनानिमित्त आयोजित केलेल्या आंतरशालेय विविध स्पर्धांमध्ये यश मिळविलेल्या विजेत्या विद्यार्थ्यांचे बक्षिस वितरण मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे व जिल्हा समाज कल्याण अधिकारी उज्वला सपकाळे यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच शाळेच्या कर्णबधिर विद्यार्थ्यांनी उपस्थित सर्वासमोर मल्लखांबचे प्रात्यक्षिक सादर केले. या शाळेत एकूण २११ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत या शाळेत विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच व्यावसायिक प्रशिक्षण दिले जात असून 'सहानुभूति नव्हें तर दिव्यांग विद्यार्थ्यांना विश्वासाची गरज आहे, संधी देण्याची आवश्यकता आहे. दिव्यांग हे देशाच्या प्रगतीचे अविभाज्य घटक आहेत, असे मार्गदर्शन जिल्हा समाज कल्याण अधिकारी उज्वला सपकाळे यांनी केले.


# ऐतिहासिक जव्हार संस्थांनाच्या नवसाला पावणारा श्री गणेश मंदिर प्राणप्रतिष्ठान सोहळा संपन्न

**अक्षराज : प्रमोद मौळे**

**दि.०५, जव्हार (पालघर) :** ऐतिहासिक जव्हार संस्थांनाच्या नवसाला पावणारा श्री गणेश मूर्तीची प्राणप्रतिष्ठान सोहळा कार्यक्रम हा जुन्या राजवाडा येथे दिनांक ०२ डिसेंबर २०२४ ते दिनांक ०५ डिसेंबर २०२४ रोजी पर्यंत कार्यक्रम संयोजन हे श्रीमंत दिग्विजयसिंघ यशवंतराव मुकणे महाराज चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या मार्फत करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात सर्वात प्रथम श्रीच्या मूर्तीची भव्य दिव्य अशी मिरवणूक व शोभायात्रा ही श्री खंडेराव महाराज मंदिर (सूर्यतलाव) येथून काढण्यात आली. त्यानंतर श्री गणेश मूर्तीची प्राणप्रतिष्ठान ही शुभ मुहूर्त वर विधी संपन्न झाला असून श्री गणेश दर्शन व महाप्रसाद व महाआरती मोठ्या स्पुर्थ उत्साहात संपन्न झाला. प्राणप्रतिष्ठान सोहळ्यात समस्त जव्हारकरांची आणि गणेश भक्तांची अनेक - अनेक वर्षाची इच्छा प्रतीक्षा सफल झाली. ३ दिवस चाललेल्या श्रींची भव्य दिव्य मिरवणूक गणेश कलश पूजन श्रींच्या सुबक आणि सुंदर मूर्तीची प्राणप्रतिष्ठा असे शुभ मुहूर्तावर सर्व धार्मिक विधी यथासांग पार पडून जुन्या राजवाड्यातील श्री गणेश मंदिर सर्वांन्ना दर्शनासाठी खुले झाले आहे.

महाप्रसाद व महाआरती मोठ्याउत्साहात संपन्न झाले. यावेळी जव्हार संस्थांनाचे श्रीमंत राजे महेंद्रसिंघ दिग्विजयसिंघ मुकणे महाराज, महाराजा ऑफ जव्हार संस्थान, चीफ ट्रस्टी, श्रीमंत दिग्विजयसिंघ यशवंतराव मुकणे महाराज चॅरिटेबल ट्रस्ट, श्रीमंत वसुंधरा



राजे महेंद्रसिंघ मुकणे राणी साहेब ऑफ जव्हार संस्थान, श्रीमंत युवराज जयदेव महेंद्रसिंघ मुकणे, श्रीमंत युवराज मार्तंडराव महेंद्रसिंघ मुकणे

तसेच राष्ट्रवादी शरद पवार गटाचे विक्रमगड विधानसभा माजी आमदार सुनील भुसारा, बहुजन विकास आघाडी पक्षाचे भोईसर विधानसभा माजी आमदार राजेश पाटील, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे तालुका अध्यक्ष संदीप माळी, बहुजन विकास आघाडी मोखाडा तालुका अध्यक्ष अमजद अन्सारी, युवा नेते सनी पवार,

सामाजिक कार्यकर्ते बाबू भाई, युवा नेतृत्व विनू दादा मौळे, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे निष्ठावंत कार्यकर्ते सोनू खुताडे, सामाजिक कार्यकर्ते रवी पोटीदा, सामाजिक कार्यकर्ते मनोज गवते, सर्व पदाधिकारी जव्हार कर तसेच सर्व गणेश भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुरूम घेऊन जाणारे टिप्पर महसूल कर्मचाऱ्यांनी केले जप्त

**अक्षराज : कैलास राठोड**

**दि.०५, किनवट (नांदेड) :** किनवटच्या तहसिलदार डॉ.शारदा चौंडेकर यांनी गौणखनिजाची चोरी करणार्याविरुद्ध युद्धपातळीवर धरपकड मोहीम चालु केली आहे. दिनांक ०५ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी त्यांच्या आदेशानुसार मंडळ अधिकारी देविदास कांबळे, तलाठी भाग्यश्री तेलंगे यांच्यासह इत्तरांचा समावेश असलेल्या महसूल पथकाने राजगडहून किनवटला मुरुम घेऊन येणारे टिप्पर राजगड घाटात पकडून तहसिल कार्यालयात लावले.



पर्यावरणाला बाधा पोहोचवणार्या यंत्रणेविरुद्ध किनवटच्या पत्रकारांनी आक्रमक पावित्रा घेतला असल्यामुळे प्रशासनाचीसुद्धा नाचक्की झाली. सहायक जिल्हाधिकारी मेघना कावलींनी माहूरच्या तहसीलदार विरुद्ध घेतलेल्या पावित्र्याची किनवटमध्ये पुनरावृत्ती करणार काय याकडे पत्रकारांचे लक्ष लागून आहे.

०५ डिसेंबर रोजी तहसिलदार डॉ. शारदा चौंडेकर यांच्या आदेशावरुन मंडळ अधिकारी देविदास कांबळे आणि तलाठी भाग्यश्री तेलंगे यांनी राजगड घाटात अवैध मुरुम घेऊन जाणारे एम.एच.०४-जी.आर.३८६६ क्रमांकिचे टिपर पकडले.

तलाठी अनुपमा पेंदोर, सुशिल जाधव, आदिनाथ डुकरे आणि हरीश यादव यांच्या पथकाने राजगडहून किनवटकडे चोरट्या मार्गाने भरदिवसा बिनधास्तपणे मुरुमाची वाहतूक करणारे टिपर पकडले असून वृत्त पाठवेपर्यंत पंचनामा प्रक्रिया चालू होती.

रेती, दगड, मुरुमाचे वाहाने धरुन रॉयल्टी वसूल न करता संबंधितांविरुद्ध पोलीसात मातमत्ता चोरीचे गुन्हे दाखल करुन वाहाने सोडून न देता कायम जप्त केल्याशिवाय ही अवैध धंदे थिंबतील असे वाटत नसल्याच्या लोकप्रतिक्रीया बोलक्या झाल्या आहेत.

# जोड नसलेल्या वस्त्यांच्या रस्त्यांना मंजुरी द्या

## खा.लंके यांचे मंत्री शिवराजसिंह चौहान यांना साकडे

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०५, अहिल्यानगर :** नगर लोकसभा मतदारसंघातील जोड नसलेल्या वस्त्यांच्या रस्त्यांचा सन २०२४- २५ च्या प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेमध्ये समावेश करून त्यास मंजुरी देण्याचे साकडे खासदार नीलेश लंके यांनी केंद्रीय ग्रामविकास आणि कृषि, शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंह चौहान यांना घातले.

गुरुवार, दिनांक ०५ डिसेंबर २०२४ रोजी खा.नीलेश लंके यांनी मंत्री चौहान यांनी भेट देऊन रस्त्याच्या कामांसंदर्भात निवेदन सादर केले. या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, नगर लोकसभा मतदारसंघात रस्त्याच्या जाळयाचा प्रचंड अनुशेष आहे.

अनेक गावे मुख्य रस्त्यांना जोडलेली नसल्याने



स्थानिक नागरीकांना तालुका किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी जाण्यासाठी अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. पावसाळयात नागरीकांना दैनंदिन जीवनामध्ये मोठा त्रास सहन करावा लागतो. दळणवळणात अडचणी येत असल्याने त्यांचे जनजीवन ठप्प होते.ग्रामीण भागातील रस्त्यांच्या समस्यांबाबत दखल घेऊन ग्रामीण जनतेचे जीवन सुलभ व्हावे.

दळणवळणाला गती मिळावी. यासाठी सन २०२४-२५ च्या प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेमध्ये निवेदनातील नमुद रस्त्यांचा समावेश करून त्यास मंजुरी देण्यात यावी व शहरे किंवा गावांशी जोडण्यासाठी या कामांना निधीची तरतूद करण्याची विनंती खा.लंके यांनी मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्याकडे केली.

मंत्री चौहान यांनी खासदार नीलेश लंके यांच्या निवेदनाची दखल घेऊन सन २०२४-२५ च्या प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेत निवेदनातील नमुद रस्त्यांना मंजुरी देऊन निधीची तरतूद करण्याची ग्वाही दिली.

# पालघर जिल्ह्यात प्रथमच शिवकालीन सशास्त्रांचे प्रशिक्षण वर्ग सुरू

**अक्षराज : प्रमोद मौळे**

**दि.०६, जव्हार (पालघर) :** शुक्रवार, दिनांक ०६ डिसेंबर २०२४ रोजी केंद्रशाळा साखरशेत नंबर १ येथे शिवकालीन शस्त्रे यांचे १० दिवसांचे प्रशिक्षण वर्गाची सांगता समारंभ जि.प. शाळा साखरशेत नंबर १ ता जव्हार येथे मान्यवरांना प्रात्यक्षिकेदाखवून संपन्न करण्यात आला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून विक्रमगड विधानसभेचे नवनिर्वाचित लोकप्रिय आमदार हरिश्चंद्रजी भोये हे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते. त्याचबरोबर करिश्मा नायर प्रकल्पाधिकरी तथा उपजिल्हाधिकारी, जव्हार (आयएएस) यांनी ही प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लावली. सोबत पंचायत समिती जव्हार



सभापती विजयाताई लाहरे व उपसभापती दिलीप पाडवी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी पाहुण्यांसमोर जि.प. शाळा साखरशेत नंबर - १ येथील विद्यार्थ्यांनी स्वः संरक्षण कसे करावे यांचे प्रात्यक्षिके दाखवली. प्रशिक्षक शरद पाटील राहणार संभाजीनगर (औरंगाबाद) यांनी दिलेल्या उत्तम प्रशिक्षकांनी दिलेल्या मेहनतीचे फळ उपस्थित पाहुण्यांना पाहावयास मिळाले. करिश्मा नायर प्रकल्प अधिकारी तथा उपजिल्हा अधिकारी जव्हार यांनी राबलेल्या कार्यक्रमाची तोंडभरुन स्तुती केली. नवनिर्वाचित विक्रमगड विधानसभेचे आमदार हरिश्चंद्र भोयेयांनी तर मी स्वतः राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा कार्यकता असून मी असे प्रशिक्षण वर्ग पूर्ण केलेली असून या प्रशिक्षणाचे महत्व मला माहीती आहेत. यामुळे मुलींचे स्व सरक्षण, महिला सबळीकरण यासाठी हे प्रशिक्षण अत्यंत महत्वाचे आहे असे त्यांनी सांगितले.

यावेळी जव्हार तालुक पंचायत समिती सभापती यांनी ही विद्यार्थ्यांच्या कला गुणांचे तोंडभरून कौतुक केले. याप्रसंगी जव्हार पंचायत समिती उपसभापती दिलीप पाडवीव साखरशेत ग्रामपंचायतचे सरपंच अनिता चौधरी यांची उपस्थिती कार्यक्रमाची शोभा वाढवुन गेली. सदर प्रशिक्षण वर्ग सुरु करण्यात साखरशेत केंद्राचे केंद्रप्रमुख मधुकर भोये, शाळेचे मुख्याध्यापक राजेश गवळी ज्यांनी प्रशिक्षक मिळवून दिला. श्रीकृष्णा मुरमे, शाळेतील अष्टपैलु व्यक्तिमत्वहरीचंद्र भोये यांचे मोलाचे सहकार्य लाभले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेत सर्व स्टाफ कार्यरत होता.

# स्वामी विवेकानंद महाविद्यालयात महापरिनिर्वाण दिन साजरा

**अक्षराज : अशोक लोणीकर**

**दि.०६, मुखेड (नांदेड) :** मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथे दिनांक ०६ डिसेंबर २०२४ रोजी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विवेक इनामदार तसेच छत्रपती शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य मुकुंदराज जाधव, चंद्रकांत पाटील, संतोष पाटील, पत्रकार जलील पठाण, अशोक लोणीकर, केंद्रप्रमुख अपाने, आय.क्यू.ए.सी.चे. समन्वय प्रा भारतभूषण बाळबुधे, डॉ.सूर्यकांत सकनुरे यांच्यासह महाविद्यालयीन प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख डॉ.गायकवाड यांनी केले. तर महाविद्यालयातील सांस्कृतिक व सैनिकी विज्ञान विभागाचे प्रमुख डॉ.आर.बी. बाविस्कर यांनी सामूहिक त्रिशरण, पंचशील, भीम व बुद्ध वंदना घेऊन महामानवास विनम्र अभिवादन केले. अभिवादन सभेमध्ये उपस्थितांचे आभार डॉ.आर.बी.मादळे यांनी मानले. याप्रसंगी महाविद्यालयीन सेवक बालाजी सादगिरे यांनी ही मोलाचे सहकार्य केले.

# थोडक्यात

## कोपरखैरणे विभागात अनधिकृत बांधकामावर धडक कारवाई

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०६, कोपरखैरणे (नवी मुंबई) :** अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबंधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामांविरोधात नवी मुंबई महानगरपालिका अतिक्रमण विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व डॉ. राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने कोपरखैरणे विभागात पाडकामाची कारवाई केली. नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोपरखैरणे विभाग अंतर्गत (१) छाया दत्ता किर्जत, एस.एस टाईप, रूम नं ४९५, सेक्टर-१७, कोपरखैरणे, नवी मुंबई, व (२) प्रभावती मच्छींद्र पाटील,घर क्र.५९१ युनिटस ०००३, बोनकोडे कोपरखैरणे नवी मुंबई. यांच्या बांधकामास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम ५४ अन्वये नोटीस बजावण्यात आली होती. सदर अनधिकृत बांधकामावर कोपरखैरणे विभागामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले होते. या धडक मोहिमेसाठी कोपरखैरणे विभागाचे सहा.आयुक्त प्रबोधन मवाडे, कनिष्ठ अभियंता सचिन नामवाड व इतर अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते. तसेच सदर कारवाईसाठी नमुंमपा पोलीस बंदोबस्त होता. तसेच ९ मजूर, २ इलेक्ट्रॉनिक हॅमर, गॅस कटर ०१, पिकअप व्हॅन ०१ कारवाई करीता वापर करण्यात आले.



## डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना महापरिनिर्वाण दिनी नमुंमपा मुख्यालयात अभिवादन



**अक्षराज : गणेश भवार**

**दि.०६, नवी मुंबई :** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनानिमित्त नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात ॲम्फिथिएटर येथे नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या शुभहस्ते प्रतिमापूजन करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, प्रशासन विभागाचे उपआयुक्त शरद पवार, शहर अभियंता शिरीष आरदवाड, मुख्य लेखा वित्त अधिकारी सत्यवान उबाळे, समाज विकास विभागाचे उपायुक्त किसनराव पलांडे, मालमत्ता विभागाचे उपायुक्त भागवत डोईफोडे, भांडार विभागाचे उपआयुक्त शंकर खाडे, महापालिका सचिव चित्रा बाविस्कर, सहा.संचालक नगररचना सोमनाथ केकाण, नगररचनाकार युवराज चव्हाण, शिक्षण अधिकारी अरुणा यादव, सहा.आयुक्त ऋतुजा गवळी, कार्यकारी अभियंता अजय संख्ये, शुभांगी दोडे, राजेश पवार, प्रशासकीय अधिकारी उत्तम खरात, विलास मलुष्टे, संजीव पवार आणि इतर अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विंग येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन साजरा

**अक्षराज : सुहास महांगरे**

**दि.०६, विंग (शिरवळ) :** दिनांक ०६ डिसेंबर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन म्हणुन जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा विंग येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन करून महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. सातारा जिल्हा खंडाळा तालुका मध्ये जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा विंग ही एक आदर्श शाळा म्हणून ओळखली जाते. शाळेमध्ये इयत्ता पहिली ते चौथीतील मुला मुलींनी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिना निमित्त मुलांची खुप छान अशी भाषणे झाली. तसेच शाळेतील आदर्श शिक्षक दत्तात्रय महांगरे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल मुलांना छान अशी माहिती दिली. तसेच शाळेच्या वतीने शाळेच्या आदर्श शिक्षिका उषा यादव यांनी आभार मानले. तसेच सदर कार्यक्रमाला जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा विंगच्या मुख्याध्यापक नलिनी वंजारी त्यांच्या सहकारी केदारनाथ नांदे व शालेय व्यवस्थापन कमिटीचे अध्यक्ष सुहास महांगरे, सदस्य आनंद पवार, अर्चना वाघ व इतर सदस्य व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर व क्रांतिसिंह नाना पाटील यांना अभिवादन

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०६, विंचूर (नाशिक) :** दिनांक ०६ डिसेंबर रोजी विद्यालयात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर व इंग्रजांच्या विरोधात सशस्त्र क्रांती करून पळता भुई थोडी करणारे क्रांतिसिंह नाना पाटील यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. सदर कार्यक्रमासाठी कर्मवीर भाऊराव पाटील माध्य. व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य देवढे एन ई यांनी अध्यक्ष पद भूषविले. सदर कार्यक्रम हा इ.९ वी ई च्या विद्यार्थ्यांनी यशस्वीरित्या घडवून आणला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला कार्यक्रमाचे अध्यक्ष व इतर मान्यवर यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर व क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. कार्यक्रमामध्ये खालील या विद्यार्थ्यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व क्रांतिसिंह नाना पाटील यांच्याविषयी आपले विचार व्यक्त केले.

दिव्या मघाडे, समृद्धी मुदगुल, मयुरी मुदगुल, स्वप्नाली कडलग, वैभवी उगले. कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे प्राचार्य जेवढे यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान व राज्यघटना निर्मितीमध्ये दिलेले योगदान तसेच क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.ईश्वरी शेळके व वैभवी गुंजाळ याविद्यार्थिनीने केले व कार्यक्रमाचे आभार कल्याणी मुदगुल हिने व्यक्त केले.